# शुष्क अस्थी

## लेखक टोनी अॅलामो

जुन्या करारातील यहेज्केल संदेष्ट्याला देवाने एक दृष्टान्त दिला. त्याने एक खोरे पाहिले. तेथे सर्वत्र शुष्क अस्थी पसरलेल्या होत्या. शुष्क अस्थींचे हे खोरे इस्राएल आणि सारे जग आध्यात्मिक दृष्टीने मेलेले आहेत याचे सूचक होते. या दृष्टान्तातून खिस्ताच्या पहिल्या येण्याचे भाकीत केले होते, तसेच त्याचा सुवार्तासंदेश, त्याचा परिणाम आणि 'देवाच्या वचनावर' विश्वास ठेवणाऱ्या[१] सर्वांना मरणातून सार्वकालिक जीवनात नेणारे पहिले पुनरुत्थान हेही त्या दृष्टान्तातून पूर्वीच दाखवले होते.

देवाने यहेज्केलला विचारले, "मानवपुत्रा, ह्या अस्थि सजीव होतील का? (हे आध्यात्मिक दृष्ट्या मेलेले जिवंत होतील काय?)" यहेज्केल म्हणाला, "प्रभु परमेश्वरा, हे तुलाच ठाऊक."[२] देवाने पुन्हा संदेष्ट्याशी बोलून त्याला म्हटले, "या अस्थींविषयी संदेश देऊन त्यांस म्हण, शुष्क अस्थींनो, परमेश्वराचे वचने ऐका; प्रभु परमेश्वर या अस्थींस म्हणतो, पाहा, मी तुम्हांत श्वास घालतो म्हणजे तुम्ही सजीव व्हाल."[३]

राष्ट्र या नात्याने आपल्यामध्ये काही सारांश उरलेला नाही हे इस्राएल जाणून होते.[४] आजपर्यंत ते आशाहीन, निःसत्त्व, विभागलेले असेच आहेत. परंतु देवाने यहेज्केलला सांगितले की, पहिल्या इस्राएलापेक्षा मोठे असे दुसरे राष्ट्र तो उभे करणार आहे. कारण पहिल्या इस्राएलाने पापे करण्याचे सोडून दिले नाही. दुसरे इस्राएल जगातील प्रत्येक राष्ट्रातील लोक असतील.[५] त्यांत निवडलेल्या यहूद्यांचा अवशेष आणि खऱ्या द्राक्षवेलीवर कलम केलेले असंख्य परराष्ट्रीय लोक असतील.[६] पापाच्या मृत जीवनातून सर्वकालच्या जीवनात उठवलेल्या अशा लोकांचे ते महान, पवित्र राष्ट्र असेल.[७] ते कधीही देवाच्या विरोधात जाणार नाहीत. त्यांच्यात फूट पडणार नाही. खिस्ताच्या पुनरुत्थानाच्या सामर्थ्याने व्हावयाचे हे पहिले पुनरुत्थान असणार.[८]

१९६४ मध्ये, खिस्ताच्या द्वारे माझे पहिले पुनरुत्थान झाले. त्यापूर्वी मी, टोनी अॅलामो पापे करणे आणि अनीतीने वागण्याबद्दल प्रसिद्ध होतो आणि मला देवाचे ज्ञान तर अजिबात नव्हते. देव आहे हेच मुळात मला माहीत नव्हते. देवाची वचने माझ्या दृष्टीने काल्पनिक, भाकडकथा होती. लोक देवावर अगर त्याच्या पुत्रावर विश्वास ठेवतातच कसा हे मला एक कोडेच होते. आम्ही देवावर विश्वास ठेवतो असे म्हणणाऱ्यांवर तर माझा मुळीच विश्वास नव्हता, कारण ते सर्वच ढोंगी, दांभिक होते. ते माझ्याएवढेच किंबहुना माझ्यापेक्षा अधिक पाप करीत असत. कारण हे मी त्यांच्याबरोबर राहून स्वतः पाहिले होते. निर्जीव, शुष्क अस्थी, हाडे आणि आम्ही यांत काहीच फरक नव्हता. त्यातही कोणी मला खिस्ती धर्माकडे वळवण्याचा प्रयत्न केला, तर

१. यहे.३६:१; २. यहे.३७:३; १. यहे.३७:४,५; ४. यहे.३७:११; ५. उत्पत्ति १७:४-१६, २२:१८; २६:४; ४६:३; ४८:१९; ४९:१०; निर्गम १९:६; ३२:१०; १पेत्र.२:९-१०; योहान.११:५१-५२; प्रे.कृ.१०:३४-३५; इफिस.१:१०; प्रकटी.५:९; १४:६; इब्री.८:८-१२; स्तोत्र.२२:२७; यशाया २:२ व इतर अनेक. ६. प्रकटी.७:४; रोम.११:१७,१९,२३,२४; ७. १पेत्र.२:९; ८. प्रकटी.२०:५-६; कलस्सै. २:१२; ३:१; रोम.१५:१२; १करिंथ.१५:१५,१६; १थेस्सल.४:१६

मी रागाने भडकून जाई, कारण माझ्या दृष्टीने पवित्र शास्त्र वेळ वाया दवडण्याचे साधनच होते. तेव्हा ख्रिस्ती झाल्यावर माझे काय होईल, याचे एक काळेकुट्ट चित्र नजरेसमोर दिसे. मी रस्तोरस्ती फिरून लोकांना येशूच्या सुवार्तापत्रिका वाटतो आहे, कोठेतरी मिशन कंपाउंडमध्ये एखाद्या जुनाट खोलीत राहतो आहे, सतत सुवार्ता सांगतो आहे आणि भुकेल्या लोकांना जेवण देण्यासाठी त्यांच्या रांगा लावतो आहे असेच चित्र मला दिसे.

१९६०-६५ या काळात माझ्या दृष्टीने जग चांगले उरलेच नव्हते. अमली पदार्थ मला आवडत नव्हते आणि डुकरांसारखे जगणाऱ्या घाणेरड्या लोकांची मला घृणा येई. हॉलिवुड, सनसेट स्ट्रिप आणि संपूर्ण जग येथे हिप्पींनी चालवलेला धुमाकूळ पाहून मी अगदी विटलो होतो. तसा मी काही साधुसंत नव्हतोच. लोक पापे करीत त्याबद्दल माझे काही म्हणणे नव्हते. जोपर्यंत ते बाहेरची पापे घरात आणून घरात मुलांसमोर त्याचे प्रदर्शन करीत नाहीत, तोपर्यंत त्यांनी काहीही करावे. मला त्याचे काही वाटत नव्हते. माझ्या दृष्टीने जग संपल्यातच जमा होते. ते शुष्क, निर्जीव, अमंगळ, घृणास्पद आणि ओसाड झाले होते.[९] कशातच काही अर्थ उरला नव्हता. मूल्ये तर केव्हाच इतिहासजमा झाली होती. मला वाटते ही गोष्ट जगातल्या इतर लोकांनाही माहीत होती, आणि यातील वास्तव विसरण्यासाठी ते अमली पदार्थ घेत. मंडळ्याही दांभिक होत्या आणि हेही प्रत्येकाला माहीत होते असे दिसले. संपूर्ण जगच त्याच्या स्वतःच्या पापात आणि अपराधात मेलेले होते.[१०] संपूर्ण जगच एक मोठे शुष्क अस्थींचे खोरे झाले होते. यहेज्केलने पाहिले तसेच हे होते.[११]

बेव्हरली हिल्स येथील एका कचेरीत अगदी अलौकिक प्रकारे येशूची व माझी भेट झाली. स्वतः देवाने तो व त्याचा पुत्र खरोखरी अस्तित्वात आहेत हे मला दाखवले तेव्हा मी किती घाबरलो होतो आणि तरीही सुखी, आनंदी होतो याची कोणाला कल्पनादेखील येणार नाही. त्याचा शक्तीशाली धाक बसवणारा पवित्र आत्मा मी अनुभवला आणि माझ्या अंगावर रोमांच उभे राहिले. मी त्याची समर्थ वाणी ऐकली. ती माझ्या रोमारोमातून शरीराच्या सर्व भागांत जणू भिनली. त्याची समक्षता अतिदिव्य, गौरवी आणि दिलासा देणारी, सौहार्दपूर्ण होती. देवाच्या मजबूत हाताने पकडावे तसे त्याच्या आत्म्याने मला दडपले आणि त्याचे शब्द मी ऐकले ते असे : ''ऊठ, दोन पायांवर उभा राहा आणि या खोलीतल्या सगळ्या लोकांना प्रभू येशू ख्रिस्ताची सुवार्ता सांग. त्यांना म्हणावे, तो पृथ्वीवर पुन्हा येणार आहे. असे केले नाहीस तर तू खचित मरशील.'' त्याचा आत्मा त्या कचेरीत आला आणि त्याचा भार माझ्यावर आला तेव्हाच त्याच्या अनिर्वचनीय, अजब ज्ञानाची, बुद्धीची जाणीव मला झाली.[१२] प्रत्येक अणु-परमाणू तोच होता. हवा तोच होता. गतकाळातील सर्व काही त्याला माहीत होते आणि भविष्यकाळात जे घडणार त्याचेही ज्ञान त्याला होते.[१३] मला शरम वाटली, कारण आतापर्यंत मी जे काही केले ते सर्व तो जाणतो हे माझ्या ध्यानी आले होते. नंतर त्याने मला दाखविले की, स्वर्ग आणि नरक प्रत्यक्ष अस्तित्वात आहेत. त्याने सांगितल्याप्रमाणे मी केले नाही, तर मी कोठे जाणार हे मला

**९.** मत्तय.१३:२९; अ.२४; १करिंथ.१५:२४; इब्री.९:२६; १पेत्र.४:७; **१०.** इफिस.२:१,५; कलस्सै.२:१३; **११.** यहे.३७:१; **१२.** १ शमु.२:३; गणना २४:६; १ करिंथ.१:२५; २:१६; ३:१९; स्तोत्र.३२:८; ईयोब २१:२२; नीति.२:६; ३:२०; ९:१०; लूक.१:७७; रोम.११:३३; २ करिंथ.४:६; **१३.** स्तोत्र.४४:२१; १ योहान.३:२०; १ करिंथ.३:२०; स्तोत्र.९४:११; यशाया ४६:९-१०; प्रकटी.२१:६; २२:१३.

नीटपणे समजले आणि तो स्वर्ग नसणार हेही लक्षात आले.

हा सर्व अनुभव भयचकित करणारा होता.[१४] तरीपण देव खरोखरी आहे आणि तो जिवंत आहे आणि संदेष्टे व प्रेषित ह्यांनी त्याच्याविषयी सांगितले तसाच तो आहे हे समजणे खरोखरी आश्चर्यकारक होते. त्याने स्वर्ग, आकाश, पृथ्वी आणि त्यांमध्ये आहे, ते सर्व उत्पन्न केले तेव्हा तो होता, तसाच आताही आहे. तो जराही बदललेला नाही.[१५] मी नेहमीच त्याचे भय धरून त्याची स्तुती करणार, त्याला मान देऊन त्याच्यावर प्रीती करणार आणि त्याची सेवा करणार ही माझी मनोमन खात्री पटली. अगदी मनापासून मोठ्या आनंदाने मी त्याच्यासाठी जगणार, छळ झाला तरी मागे न हटता मी त्याच्यासाठी संतोषाने मरण्यास तयार असणार हेही माझ्या लक्षात आले.[१६]

देवाने त्या कचेरीतून मला सोडले, तेव्हा मी त्याला विचारले, ''मी काय करावे? तुझी काय इच्छा आहे? तू सांगशील ते मी करीन.'' त्यावर मला उत्तर मिळाले नाही. मी चर्चमध्ये जावे हीच त्याची इच्छा असणार असे समजून मी तेथे गेलो. म्हटले सगळ्यात मोठ्या उपासनामंदिरात जावे. तेच उत्तम म्हणून मी तेथे गेलो. पण तेथे तो मला सापडलाच नाही. मग मी दुसऱ्या उपासनामंदिरात गेलो. पण तेथेही तो कोठेच नव्हता. मग मी पुस्तके वाचू लागलो, पुस्तकांच्या मुखपृष्ठावर विद्वान, धार्मिक, ज्ञानी दिसणाऱ्या माणसांची चित्रे होती. या लोकांच्या दाढ्या लांबलचक असून त्यांनी धर्माला शोभणारी वस्त्रे घातली होती. परंतु ती पुस्तके सगळी चूक आहेत हे माझ्या लक्षात आले कारण देवाला भिण्याचे कारण नाही,[१७] देव लोकांना धमकावीत नाही, आणि पाप केलेत तरी नरकात जावे लागत नाही[१८] असे त्यांत लिहिले होते. पण असा देव कुठे आहे ते शोधण्याची चिंता मला नव्हती. मला हवा होता मला धमकावणारा, धाकात ठेवणारा देव.[१९] मला स्वर्ग आणि नरक दाखवणारा, मला अद्याप कोणी करायला लावले नाही, मला जे करण्याची इच्छा नव्हती ते करायला लावणारा देव मी शोधीत होतो.

पण पवित्र शास्त्रामध्ये हे सत्य आढळेल असे माझ्या कधी मनातही आले नाही. कारण पवित्र शास्त्राच्या प्रती जिकडे पाहावे तिकडे भरपूर होत्या आणि सर्वसामान्य लोक जे घेतात, वाचतात त्यात उपयुक्त, महत्त्वाचे काहीच असणार नाही असा माझा समज होता. कारण माझ्या दृष्टीने हे सर्वसामान्य लोक सगळे खुळे, बावळट होते. परंतु अखेरीस मी पवित्र शास्त्र वाचू लागलो. त्यात मला तारणाची योजना मिळाली, तसेच सार्वकालिक जीवन म्हणजे काय, ख्रिस्तामध्ये कसे वाढावे आणि आध्यात्मिक दृष्ट्या त्याच्यासाठी भरपूर आत्मे जिंकणारा कसे व्हावे याविषयी संपूर्ण मार्गदर्शन तेथेच मिळाले.[२०]

मी प्रथम पवित्र शास्त्र वाचू लागलो, तेव्हा मला पूर्वीचाच अनुभव आला. म्हणजे बेव्हर्ली हिल्स येथील कचेरीत देवाच्या सामर्थ्याचा भार माझ्यावर आला होता, तसाच आताही आला.

**१४.** २ करिंथ.५:११; उत्पत्ति ३५:५; यिर्मया ३२:२१; ईयोब ३१:२३; लेवीय २६:१६; यहे.३२:३२; **१५.** मलाखी ३:६; इब्री.१३:८; उत्पत्ति १:१; प्रे.कृ.४:२४; **१६.** स्तोत्र.५:११; ३५:१९; योहान.१६:३३; रोम.१२:८; १५:१३; प्रे.कृ.२:२८; २०:२४; यशया ५१:११; ६१:१०; २ करिंथ.८:१२; **१७.** उत्पत्ति २२:१२; स्तोत्र.११२:१; नीति.१३:१३; १४:१६; २८:१४; ३१:३०; उपदेशक ७:१८; **१८.** नीति.८:३६; यहे.१८:२,४; प्रकटी.१९:२०; २०:१०,१४,१५; २१:८; **१९.** उत्पत्ति २:१७; ६:७,९,१३; निर्गम २०:५; ३४:७; ३२:३३; मत्तय.८:१२; २२:१३; प्रकटी.२०:१५; प्रकटी.२:५,१६,२२-२३; ३:३; मार्क.१६:१६; यहे.३:१८; १८:२०; **२०.** योहान.४:३५-३६; १५:५,८,१५-१६; प्रकटी.१४:१८.

पुढे देवाने मला स्वर्ग आणि नरक यांच्याविषयीचे आणखी दृष्टान्त दाखवले.[२१] मी मोठ्याने ओरडून देवाला म्हटले, "हे प्रभू, नको, नको, मला नरकात पाठवू नको." मग मला स्वर्ग दिसला आणि मला स्वर्गातील शांतीचा अनुभव आला.[२२] आध्यात्मिक दृष्टीने मी अंधळा, उघडावाघडा, आणि यःकश्चित, क्षुद्र होतो तरी मी देवाला म्हटले, मला असेच राहू दे. पण या स्वर्गीय शांतीचा अनुभव मला नित्य असू दे. पुन्हा एकदा मी नरक पाहिला आणि पुन्हा एकदा मी दया आणि क्षमा मिळावी म्हणून देवाला आळवले. मग येशूवरील माझा विश्वास आणि त्याने माझ्यासाठी दिलेले रक्त आणि मी ऐकलेली देवाची वचने व त्यानुसार केलेले आज्ञापालन[२४] देवाच्या वचनावरील विश्वास यांच्याद्वारे पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा यांचे महान सामर्थ्य माझ्या मर्त्य शरीरामध्ये आले.[२३] मी आतापर्यंत केलेल्या प्रत्येक पापाचे ओझे माझ्या आत्म्यावरून दूर झाले असे मला जाणवले,[२५] मी स्वच्छ आणि शुद्ध झालो.[२६] मला काहीतरी अद्‌भुत, आश्चर्यकारक झाले होते आणि ते मला आणि माझ्यासाठी ख्रिस्त येशूने 'इस्राएलाच्या पवित्र प्रभूने' केले होते.[२७] पापापासून सुटका झाल्याचा, आणि पापापासून दूर ठेवण्यास समर्थ अशा नव्या शक्तीचा लाभ झाल्याचा माझा आनंद गगनात मावेना. हे संपूर्ण जगाला सांगावे, त्यांनीही त्याला ओळखावे आणि सर्वकाळचे जीवन मिळवावे अशी इच्छा मला झाली.

आता मी एकतीसहून अधिक वर्षे ख्रिस्ताच्या सेवेत आहे, तरीसुद्धा मी जेव्हा जेव्हा पवित्र शास्त्र वाचतो तेव्हा तेव्हा एके काळी शुष्क, निर्जीव असणाऱ्या या अस्थींमध्ये स्वर्गातून आध्यात्मिक पोषक अन्नाचा वर्षाव होतो असे अनुभवास येते. एके काळच्या या शुष्क अस्थींच्या सभोवती आता देवाच्या वचनाने आध्यात्मिक स्नायूंचे वेष्टन घातले आहे. त्यांवर आध्यात्मिक चिलखत मांस व कातडी म्हणून घातले आहे. देवाच्या प्रत्येक वचनातून ख्रिस्त माझ्या अंतःकरणात अधिकाधिक दृढ झाला आहे. देवाच्या प्रत्येक वचनातून पवित्र आत्म्याचा श्वास माझ्या आत्म्यामध्ये येत आहे, आणि त्यातूनच वर्षानुवर्ष सैतान माझ्यावर सोडीत असलेल्या जळत्या अग्निबाणांना विझवण्याचे, त्याचा सामना करण्याचे सामर्थ्य मला मिळत आहे. आम्ही "ख्रिस्तामध्ये महाविजयी"[२८] आहोत आणि त्याच्यामध्ये "परिपूर्ण" आहोत,[२९] हे दिवसेंदिवस माझ्या अनुभवास येत आहे. तसेच येशूचा प्रत्येक शब्द, प्रत्येक आज्ञा पाळणे किती अगत्याचे, किती महत्त्वाचे आहे तेही मी जाणून आहे. मेघांमधून स्वर्गामध्ये चढून जाण्यापूर्वी काही क्षण अगोदर त्याने सांगितले आहे : "सर्व जगात जाऊन संपूर्ण सृष्टीला सुवार्तेची घोषणा करा"[३०] (म्हणजे प्रत्येक शुष्क अस्थीला, आध्यात्मिक दृष्टीने मृत असलेल्या

**२१.** प्रे.कृ.७:५५-५६;लूक.१६:२२-३१;प्रकटी.४:१-११; १५:१-४; २१:२-५; १०:२७; २२:१-५; यशाया ५:१४; १४:९; प्रकटी.१४:१०-११; २०:१०; **२२.** रोम.५:१; इफिस.२:१४; फिलिप्पै.४:७; कलस्सै.३:१५; १ थेस्सल.५:२३; २ थेस्सल.३:१६; **२३.** २ करिंथ.६:१६; १ पेत्र.२:५; लेवीय २६:११-१२; योहान.१४:१६; १ योहान.३:२४; **२४.** हब.२:४; मत्तय.१७:२०; लूक.७:५०; प्रे.कृ.२०:२१; २६:१८; रोम.१:१७; ३:२८; ५:२; १०:१७; ११:२०; गलती.२:१६; ३:११; इफिस.२:८; ३:१७; इब्री.१०:३८; **२५.** मार्क.१४:२४; योहान.६:५३; प्रे.कृ.२०:२८; रोम.३:२५; ५:९; इफिस.१:७; २:१३: कलस्सै.१:१४,२०; इब्री.९:१२; १४:२२; १ पेत्र.१:१८-१९; प्रकटी.१:५; ५:९; **२६.** १ योहान.१:७; इब्री.१०:१९-२२; प्रकटी.१:५; ७:१४; **२७.** स्तोत्र.८९:१८; प्रे.कृ.३:१३-१४; **२८.** रोम.८:३७; १योहान.४:३-४; **२९.** कलस्सै.२:१०; **३०.** मार्क.१६:१५; लूक.१४:२३

प्रत्येकाला सुवार्तासंदेश सांगा. म्हणजे त्यांना "परमेश्वराचे वचन ऐकता येईल"[३१]) जो विश्वास धरतो व बाप्तिस्मा घेतो त्याचे तारण होईल; जो विश्वास धरीत नाही तो शिक्षेस पात्र ठरेल."[३२]

तुम्हीही माझ्यासारखेच असाल आणि आपणांला नरकदंड होऊ नये, तर आपले तारण व्हावे अशी तुमची इच्छा असेल, तर देवाला उद्देशून पुढील प्रार्थना म्हणा :

**"माझ्या प्रभू, आणि माझ्या देवा, माझ्या आत्म्यावर, मज पाप्यावर दया कर. येशू ख्रिस्त जिवंत देवाचा पुत्र आहे असा माझा विश्वास आहे; माझ्या सर्व पापांची क्षमा व्हावी म्हणून वधस्तंभावर तो मरण पावला आणि त्याने आपले रक्त सांडले असा माझा विश्वास आहे. माझा विश्वास आहे की देवाने पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने येशूला मेलेल्यांमधून उठवले, आणि या क्षणाला तो देवाच्या उजव्या हाताशी बसून माझ्या पापांची ही कबुली आणि ही प्रार्थना ऐकतो आहे. मी माझ्या अंतःकरणाचे दार उघडतो आणि हे प्रभू येशू माझ्या अंतःकरणात ये अशी मी तुला विनंती करतो. काल्वरीच्या वधस्तंभावर माझ्या जागी तू सांडलेल्या मोलवान रक्ताने माझी सर्व गलिच्छ पापे धुऊन टाक. प्रभू येशू तू मला टाकणार नाहीस, माघारा पाठवणार नाहीस, तू माझ्या पातकांची क्षमा करशील आणि माझ्या आत्म्याचे तारण करशील हे मला माहीत आहे. कारण तुझे वचन, पवित्र शास्त्र तसे सांगते. आणि त्यात माझाही समावेश आहेच. म्हणूनच माझी खात्री आहे की, तू माझी प्रार्थना ऐकली आहेस आणि मला उत्तर दिले आहेस हेही मी जाणतो. तसेच माझे तारण झाले आहे ह्याचीही मला खातरी आहे. हे प्रभू येशू तू माझे तारण केलेस म्हणून मी तुझे आभार मानतो आणि तुझ्या आज्ञेप्रमाणे मी सदोदित वागेन आणि यापुढे कधी पाप करणार नाही तसेच मी सदोदित तुला धन्यवाद देऊन तुझी स्तुती करीन.**

आता तुमचे तारण झाले आहे. तुमच्या पापांची क्षमा झाली आहे म्हणून तुम्ही आपले दोन्ही हात उंच करून प्रभूची स्तुतिस्तोत्रे गा : "आकाश हर्षो, पृथ्वी उल्लासो, राष्ट्रांमधल्या लोकांस विदित करा की, परमेश्वर राज्य करतो."[३३]

आता ख्रिस्त पवित्र आत्म्याच्या द्वारे तुमच्यामध्ये राहतो[३४] आणि तुमच्यामध्ये असलेल्या देवाच्या दिव्य स्वभावाचा अधिक वाटा प्राप्त करून घेण्याचा एक मार्ग आहे. देवपिता देखील आता तुमच्यामध्ये राहतो. तुमच्यामध्ये देवाचा दिव्य स्वभाव जेवढा अधिक राहील तेवढे तुमच्यावर येणाऱ्या मोहांना ठामपणे विरोध करता येईल. या मोहांमुळे लक्षावधी ख्रिस्ती लोक आपल्या तारणाला मुकले आहेत. याला कारण एकच, ते म्हणजे आमच्यामध्ये देवाचे प्राबल्य असण्याऐवजी माणसाचेच वर्चस्व अधिक झालेले असते. आज मानवजात एवढी दुष्ट झाली आहे की, सैतान आणि त्याची भुतावळ यांचे समूळ उच्चाटन केले, तर आम्हीच आमचे सैतान होऊ, त्यात उणे पडणार नाही.

आता तुमचे तारण झाले आहे, तेव्हा पवित्र आत्म्याने बाप्तिस्मा व्हावा म्हणून प्रार्थना करा. देवाच्या वचनाचा प्रार्थनापूर्वक अभ्यास करा आणि दिव्य स्वभावाचा अधिकाधिक वाटा मिळावा यासाठी प्रार्थना करा.[३५] पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा आणि देवाचा पवित्र स्वभाव हे कसे

**३१.** यहे.३७:४; २ राजे २०:१६; यशया १:१०; यिर्मया २:४; **३२.** मार्क.१६:१६; २ थेस्सल.२:१२; **३३.** १ इति.१६:३१; **३४.** रोम.८:११; **३५.** २ तीमथ्य.२:१५,२१; लूक.२१:३६; योहान.१५:३

प्राप्त करून घ्यावे ते समजण्यासाठी आमचे मार्गदर्शनपर साहित्य मागवून घ्या, अगर आम्हांला फोन करा. कारण पवित्रतेवाचून कोणालाही देवाला पाहता येणार नाही.[३६]

आता तुमचे तारण झाले आहे म्हणून या आज्ञेचे पालन करा. पित्याच्या नावाने आणि पुत्राच्या नावाने आणि पवित्र आत्म्याच्या नावाने पाण्यामध्ये संपूर्णपणे बुडी मारून बाप्तिस्मा घ्या.[३७] देवाच्या सर्व आज्ञांचे पालन करा आणि शांतीने राहा.[३८]


**टोनी अॅलामो, वर्ल्ड पास्टर**

**होली अॅलामो ख्रिश्चन चर्च,**

**पो. ऑ. बॉक्स ३९८, अॅल्मा, अॅर्केन्सास, ७२९२१, यु. एस. ए.**

**००१ (५०१) ७८२-७३७० किंवा फॅक्स (५०१) ७८२-७४०६**

**इंटरनेट वेब पेज www.alamoministries.com**


अधिक माहिती अगर मार्गदर्शन मिळवण्यासाठी पुढील पत्त्यावर पत्र पाठवा.


*अॅलामो ख्रिश्चन मिनिस्ट्रीज*

*पो. ऑ. बॉक्स १२६, हैद्राबाद, ए. पी. ५०० ००१, भारत*


पास्टर अॅलामो ह्यांनी अनेक पुस्तके लिहिली आहेत. ती मागवून घ्या; ती विनामूल्य मिळतील. पास्टर अॅलामो ह्यांचे *'मशीहा'* हे छोटे पुस्तक विनामूल्य मिळेल. यात मशीहासंबंधीची जुन्या करारातील ३३३ भविष्ये दिली आहेत. पास्टर अॅलामो ह्यांच्या अनेक प्रवचनांच्या ध्वनिफीती उपलब्ध आहेत.

हे साहित्य भाषांतर करून दुसऱ्या भाषांमध्ये छापण्यास आमची परवानगी आहे. हे छापा आणि जगातील प्रत्येक व्यक्तीला द्या. ''मग त्याने त्यांना सांगितले की सर्व जगात जाऊन संपूर्ण सृष्टीला सुवार्तेची घोषणा करा.''[३९] हे साहित्य दुसऱ्या भाषेत छापताना या साहित्याचे हक्क व नोंदणी यासंबंधीचा पुढील मजकूर न चुकता जरुर छापावा :


© कॉपीराईट नोव्हेंबर १९९५ सर्व हक्क स्वाधीन

वर्ल्ड पास्टर टोनी अॅलामो ® पंजीकृत १९९५


ही पत्रिका ऑक्टोबर १९९५ मध्ये तुरुंगात असताना लिहिली आहे. ख्रिस्तासाठी तुरुंगवास पत्करणे ही पास्टर अॅलामो ह्यांना मोठी आनंदाची गोष्ट वाटते.

**तारणाची एकमेव योजना या पत्रिकेतून दिली आहे. कृपया ही पत्रिका टाकू नका, ती दुसऱ्या कोणाला तरी द्या.**

**३६.** इब्री.१२:१४; **३७.** मत्तय.२८:१९; **३८.** अनु. ८:१; ३०:१६; नीति.४:४; ७:२; **३९.** मार्क.१६:१५